# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. २७/०२/२०१५**

आज शुक्रवार दि. २७/०२/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा दुपारी १२.०० वाजता सभा सुचना क्र. ७ दि. १८/०२/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. पिठासीन अधिकारी, श्रीम. शैला ए., जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

१) कॅटलीन ऍन्थोनी परेरा
२) सय्यद नुरजहाँ नझर हुसेन
३) केळुसकर प्रशांत नारायण
४) पाटील ध्रुवकिशोर मन्साराम
५) मेहता नरेंद्र लालचंद
६) सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स
७) असेन्ला मेंडोन्सा परेरा
८) ॲड. रवि व्यास
९) कोठारी सुमन रमेश
१०) कांगणे यशवंत ठकाजी
११) सिंग मदन उदितनारायण
१२) पाटील रोहिदास शंकर
१३) म्हात्रे कल्पना महेश
१४) पिसाळ मनिषा नामदेव
१५) पांडे हंसूकुमार कमलकुमार
१६) निलम हरिश्चंद्र ढवण
१७) जाधव मोहन महादेव
१८) पाटील सुनिता कैलास
१९) वेतोसकर राजेश शंकर
२०) अरविंद दत्ताराम ठाकुर
२१) प्रभात प्रकाश पाटील
२२) प्रेमनाथ गजानन पाटील
२३) शर्मा सुनिला सत्येंद्र
२४) मेहता डिंपल विनोद
२५) जयंतीलाल गुरुनाथ पाटील
२६) संध्या प्रफुल्ल पाटील
२७) पाटील वंदना विकास
२८) प्रविण मोरेश्वर पाटील
२९) घरत तारा विनायक
३०) आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र
३१) भानुशाली वर्षा गिरीधर
३२) पाटील वंदना मंगेश
३३) मुन्ना सिंग
३४) रावल भगवती जयशंकर
३५) शाह राकेश रतिशचंद्र
३६) शरद केशव पाटील
३७) मेघना दिपक रावल
३८) जैन गिता भरत
३९) डॉ. जैन रमेश धरमचंद
४०) शुभांगी महिन कोटियन
४१) डॉ. राजेंद्र जैन
४२) बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स

४३)	मेंन्डोंसा स्टिवन जॉन
४४)	प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील
४५)	रॉड्रीक्स मॉरस जोसेफ
४६)	ग्रिटा स्टिफन फॅरो
४७)	डॉ. आसिफ गुलाब शेख
४८)	जयमाला किशोर पाटील
४९)	संदिप मोहन पाटील
५०)	गोविंद हेलन जॉर्जी
५१)	डिमेलो बर्नड अल्बर्ट
५२)	बगाजी शर्मिला विन्सन
५३)	लियाकत ग. शेख
५४)	परमार अनिता भरत
५५)	पाटील प्रणाली संदिप
५६)	रकवी सुहास माधवराव
५७)	झिनत रऊफ कुरेशी
५८)	खण्डेलवाल सुरेश
५९)	पाटील नरेश तुकाराम
६०)	शेख शबनम लियाकत
६१)	सुजाता रविकांत शिंदे
६२)	पुजारी कांचना शेखर
६३)	काझी रशीदा जमील
६४)	इनामदार जुबेर
६५)	शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम
६६)	म्हात्रे सुर्यकांत खंडोजी
६७)	डिसा मर्लिन मर्विन
६८)	शाह सिमा कमलेश
६९)	कासोदरिया अश्विन श्यामजी
७०)	डॉ. नयना मनोज वसानी
७१)	जैन दिनेश तेजराज
७२)	दळवी प्रशांत ज्ञानदेव
७३)	विराणी रेखा अनिल
७४)	सामंत प्रमोद जयराम
७५)	अनिता जयवंत पाटील
७६)	म्हात्रे परशुराम पद्माकर
७७)	भोईर भावना राजू
७८)	भोईर राजू यशवंत
७९)	वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा
८०)	अरोरा दिपिका पंकज
८१)	भावसार शिल्पा कमलेश
८२)	वंदना रामदास चक्रे
८३)	कमलेश यशवंत भोईर
८४)	गावंड मंदाकिनी आत्माराम
८५)	प्रभाकर पद्माकर म्हात्रे
८६)	मीरादेवी रामलाल यादव
८७)	अनिल बाबुराव भोसले
८८)	रविंद्र भिमदेव माळी
८९)	दक्षता राजेंद्र ठाकूर

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

१)	अशोक सुर्यदेव तिवारी
२)	सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद

**<u>रजेचा अर्ज – निरंक</u>**

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा शुक्रवार दि. २७/०२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७, दि. १८/०२/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६७, मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे महापौर पदावर निवड करणे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महापौर पदाचे निवडणुकीकरिता दि. २३/०२/२०१५ रोजी दुपारी ०३.०० ते सायं. ०५.०० या वेळेमध्ये नामनिर्देशन पत्र मागविले असता पुढील एकुण पाच उमेदवारांनी आपली ९ नामनिर्देशन पत्र दाखल केलेली आहेत. १) भोईर भावना राजु २) कॅटलीन ऍन्थोनी परेरा (दीदी) ३) जैन गिता भरत ४) प्रभात प्रकाश पाटील ५) पुजारी कांचना शेखर या उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे मा. पिठासीन अधिकारी यांजकडे सुपूर्द करीत आहे.

**पिठासीन अधिकारी :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम मा. महापौर आणि उपमहापौर ह्या पदासाठी निवडणूक घेणे नियम ६-१ प्रमाणे प्राप्त झालेल्या नामनिर्देशनाची छाननी महापौर पदासाठी पूर्ण झालेली आहे. एकूण ९ नामनिर्देशनपत्र प्राप्त झालेले होते. सर्व नामनिर्देशन पत्र वैध आहेत. ५ उमेदवार वैध आहेत असे मी घोषित करते. वैध असलेल्या उमेदवाराची नावे सदरील नियमाच्या ६ (२) प्रमाणे मी वाचून दाखवते. १) कॅटलीन ऍन्थोनी परेरा (दीदी) २) जैन गिता भरत ३) पूजारी कांचना शेखर ४) प्रभात प्रकाश पाटील ५) भोईर भावना राजू. सदरील नियमाच्या ६ (३) प्रमाणे कोणत्याही उमेदवाराला त्याची उमेदवारी मागे घ्यायची असेल तर त्याच्यासाठी १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. १२.०५ मिनिटांनी १५ मिनिटांचा कालावधी सुरु होत आहे. १२.०५ ते १२.२० पर्यंत.

**नरेंद्र मेहता :-**

पिठासीन अधिकारी महोदय हे सभागृहात काय चालले आहे. कामकाजाला सुरुवात झाली आहे. सभागृहात आल्यानंतर कोणत्याही सदस्यावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दबाव आणता येत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पिठासीन अधिकारी तो कोणत्याही प्रकारचा दबाव नाही ते राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक आहेत.

**पिठासीन अधिकारी :-**

बैठक चालू झाल्यानंतर आपण काही करु शकत नाही. महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक घेणे नियम २००५ रूल ६ (५) प्रमाणे उमेदवाराने वेळेत उमेदवारी अर्ज मागे घेतलेल्यांची नावे मी वाचून दाखवते. १) श्रीम. पुजारी कांचना शेखर २) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील ३) श्रीम. भोईर भावना राजू.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक घेणे नियम २००५ चा नियम ७ (२) प्रमाणे एका पेक्षा जास्त उमेदवार आहेत तर सदरील उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे अपेक्षित आहे. १) कॅटलिन ऍन्थोनी परेरा २) जैन गिता भरत.

सदरील नियमाच्या ७ (३) प्रमाणे निवडणुक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे नाव वर्णानुक्रमे मी घोषीत करणार आहे. घोषीत केल्यानंतर त्यांच्या बाजून इच्छूक असलेल्या सदस्यांनी त्यांचे हात वर करुन मतदान करायचे आहे.

श्रीम. कॅटलिन ऍन्थोनी परेरा ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करुन सही करायची आहे. श्रीम. जैन गिता भरत ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हातवर करुन सही करायची आहे. महापौर व उममहापौर पदाच्या निवडणूकीसाठी आज घेतलेल्या विशेष बैठकीमध्ये ८९ सदस्य हजर होते. एकूण ९१ सदस्य आहेत त्यापैकी २ सदस्य गैरहजर होते. सर्व सदस्यांनी त्यांच्या मतदानाचा हक्क बजावलेला आहे. श्रीम. गिता भरत जैन ह्यांना ४८ मते मिळाली आहेत. श्रीम. कॅटलीन ऍन्थोनी परेरा ह्यांना ४१ मते मिळाली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका महापौर आणि उपमहापौर ह्या पदासाठी निवडणूक घेणे नियम २००५ नियम ७ (७) अन्वये ह्या दोन उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्रीम. जैन गिता भरत ह्यांना मिळाली असल्याने त्याची महापौर पदी बहुमताने निवड झाल्याचे मी घोषित करत आहे.

**प्रकरण क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे महापौर पदावर निवड करणे.

**ठराव क्र. ५० :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(२) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या **''महापौर''** पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण पाच उमेदवारांनी, नऊ नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. उमेदवारांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) भोईर भावना राजू
२) कॅटलीन ऍन्थोनी परेरा
३) जैन गिता भरत

४) प्रभात प्रकाश पाटील
५) पुजारी कांचना शेखर

नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता **१) श्रीमती भावना राजु भोईर २) श्रीमती प्रभात प्रकाश पाटील ३) श्रीमती पुजारी कांचना शेखर** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन उमेदवारी मागे घेतलेली आहे. एकुण तीन उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतल्याने, दोन उमेदवार शिल्लक राहिले. **''महापौर''** पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **श्रीमती कॅटलीन एँन्थोनी परेरा** यांना **४१** इतकी मते व **श्रीमती जैन गिता भरत** यांना **४८** इतकी मते मिळाली. तसेच **००** सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी **श्रीमती जैन गिता भरत यांना जास्त मते** मिळाल्याने **श्रीमती जैन गिता भरत** ह्या **''महापौर''** पदी बहुमताने निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**महापौर / उपमहापौर निवडणुक-२०१५**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**पिठासीन अधिकारी :-**

आता उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया सुरु होत आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र ६८ मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे उपमहापौर पदावर निवड करणे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. उपमहापौर पदाचे निवडणुकीकरिता दि. २३/०२/२०१५ रोजी दुपारी ०३.०० ते सायं. ०५.०० या वेळेमध्ये नामनिर्देशन पत्र मागविले असता पुढील एकुण सहा उमेदवारांनी आपली दहा नामनिर्देशन पत्र दाखल केलेली आहेत. १) जाधव मोहन महादेव २) रविंद्र भिमदेव माळी ३) प्रविण मोरेश्वर पाटील ४) पांडे हंसुकूमार कमलकुमार ५) इनामदार जुबेर ६) प्रभात प्रकाश पाटील या उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे मा. पिठासीन अधिकारी यांजकडे सुपूर्द करीत आहे.

**पिठासीन अधिकारी :-**

महानगरपालिका मा. महापौर आणि मा. उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे नियम ६ (१) प्रमाणे प्राप्त झालेल्या त्यात ६ जणांनी उमेदवारी अर्ज भरलेले आहेत. त्यांची नावे मी वाचून दाखवते. १) इनामदार जुबेर २) जाधव मोहन महादेव ३) पांडे हंसुकुमार कमलकुमार ४) प्रभात प्रकाश पाटील ५) प्रविण मोरेश्वर पाटील ६) रविंद्र भिमदेव माळी सदरील नियम ६ (३) प्रमाणे कोणत्याही उमेदवाराला उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा असेल तर १५ मिनिटांचा कालावधी १२.४८ ते १.०३ पर्यंत देण्यात येतो. सदर वेळेत उपमहापौर पदासाठी उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे सदरील नियमाच्या नियम ६(५) प्रमाणे १) इनामदार जुबेर २) जाधव मोहन महादेव ३) प्रभात प्रकाश पाटील ४) रविंद्र भिमदेव माळी

सदरील नियमाच्या नियम ७(२) प्रमाणे एकापेक्षा अधिक उमेदवार निवडणूक लढवीत आहे तर सदरील उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे लावणे अपेक्षित आहे. १) पांडे हंसुकुमार कमलकुमार २) प्रविण मोरेश्वर पाटील सदरील नियमाच्या नियम ७ (३) प्रमाणे पांडे हंसुकुमार ह्यांच्या बाजुने इच्छूक असतील त्यांनी हात वर करुन सही करायची आहे. आता श्री. प्रविण पाटील ह्यांच्या बाजूने इच्छूक असतील त्यांनी हात वर करुन सही करायची आहे.

उपमहापौर पदासाठी घेतलेल्या विशेष बैठकीमध्ये ८९ सदस्य हजर आहेत. एकूण ९१ सदस्य आहेत. त्यापैकी २ सदस्य गैरहजर आहेत. बाकी सर्वांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

श्री. प्रविण मोरश्वर पाटील ह्यांना ४८ मते मिळाली आहेत. श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार ह्यांना ४१ मते मिळाली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका महापौर आणि उपमहापौर ह्या पदासाठी निवडणूक घेणे नियम ७(७) प्रमाणे श्री. प्रविण मोरेश्वर पाटील ह्यांना सर्वाधिक मते मिळाली असल्यामुळे श्री. प्रविण मोरेश्वर पाटील हे उपमहापौर पदी बहुमताने निवड झाल्याचे मी घोषित करत आहे.

**प्रकरण क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे उपमहापौर पदावर निवड करणे.

**ठराव क्र. ५१ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(२) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे

मागविली असता एकूण सहा उमेदवारांनी, दहा नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या उमेदवारांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) जाधव मोहन महादेव
२) रविंद्र भिमदेव माळी
३) प्रविण मोरेश्वर पाटील
४) पांडे हंसुकूमार कमलकुमार
५) इनामदार जुबेर
६) प्रभात प्रकाश पाटील

नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. उपमहापौर पद हे एकच पद असुन, या पदासाठी एकुण सहा उमेदवार आहेत. करिता प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता **१) श्री. जाधव मोहन महादेव व २) श्री. रविंद्र भिमदेव माळी ३) श्री. इनामदार जुबेर ४) श्रीमती प्रभात प्रकाश पाटील** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केला. एकुण चार उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतल्याने, दोन उमेदवार शिल्लक राहिले. **''उपमहापौर''** पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **श्री. पांडे हंसुकूमार कमलकुमार** यांना **४१** इतकी मते व **श्री. प्रविण मोरेश्वर पाटील** यांना **४८** इतकी मते मिळाली. तसेच **००** सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी **श्री. प्रविण मोरेश्वर पाटील** यांना जास्त मते मिळाल्याने **श्री. प्रविण मोरेश्वर पाटील** हे **''उपमहापौर''** पदी बहुमताने निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**महापौर / उपमहापौर निवडणुक - २०१५**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(सभा संपल्याची वेळ १.०० वाजता)**

**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**